# <u>अकर्म पूजा</u>

देवा तुझे नाम हीच माझी पूजा
नाही मनी शब्द कोणताही दूजा...

रिता माझा हात तरी तुझी साथ
नाही धूप दिवा नाही गंधफूल
तरी मानस पूजा स्वीकारावी...

ऐश्वर्याचा थाट वाटे आता गौण
देवा तुझे दर्शन करी शब्द मौन
तरी अबोल पूजा स्वीकारावी...

अद्‌वैत संपू दे हीच ही विनंती
देहाची काळजी घेते नित् सृष्टी
तरी अकर्म पूजा स्वीकारावी...